| | | |
|---|---|---|
| **CNR No.: MHPU05-000009-2016** | दाखल दिनांक | – २१/०१/२०१६ |
| | नोंदणी दिनांक | – २१/०१/२०१६ |
| | निकाल दिनांक | – २२/०७/२०२६ |
| | कालावधी | – वर्षः १० महिनेः ०६ दिवसः ०१ |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पुणे महानगर पालिका न्यायालय, जि. पुणे**
**(पिठासीन अधिकारी श्रीमती एन. एस. सय्यद)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ४/२०१६** **निशाणी क्रमांक: ५९**

| | |
|---|---|
| फिर्यादचा तपशील | गुन्हा घडल्याची तारीख – ०५/११/२०१५ पुणे महानगरपालिका हद्दीतील, सर्वे नंबर १/८ व २/८ एरंडवना, सिल्वर वुड बिल्डींग, कर्वे रोड, पाळंदे कुरिअरच्या मागे, पुणे–४. |
| तक्रारकर्ता | **पुणे महानगरपालिका** तर्फे,<br>श्री. अनिल साबळे, हॉर्टीकल्चर मिस्त्री, छत्रपती संभाजीराजे उद्यान, शिवाजीनगर, पुणे मनपा. |
| फिर्यादी तर्फे सादरकर्ता – विधिज्ञ | श्री. शिवाजीराव पाटील |
| आरोपी | **श्री. किरण रमेशलाल बोरा**<br>राहणारः– १५८५, सदाशिव पेठ, टिळक रोड, पुणे–४११०३०. |
| आरोपीकरिता/तर्फे सादरकर्ता – | विधिज्ञ श्री. शिरीष थिटे |

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | गुन्हा ठेवल्याचा तपशील | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा केली | किती शिक्षा दिली | खटला चालू असताना आरोपी कारागृहात असल्याबाबतचा तपशील |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. किरण रमेशलाल बोरा | अटक नाही. | -- | महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ चे कलम ८(१) सह कलम २१(१) अन्वये | निर्दोष मुक्त केले. | लागू नाही. | लागू नाही. |

## फिर्यादीतर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी

| अ. क्र. | नाव | साक्षीचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | श्री. अनिल भाऊ साबळे | फिर्यादी |

## बचावपक्षातर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी

| अ. क्र. | नाव | साक्षीचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय

## (पारित दिनांक २२ जुलै, २०२६)

०१. प्रस्तुत खटला आरोपींविरुध्द **महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व**

**जतन अधिनियम, १९७५ चे कलम ८(१) सह कलम २१(१)** अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्याचे आरोपांबाबत चालविणेत आला.

**०२.** फिर्यादी पक्षातर्फे असे कथन आहे की, पुणे महानगरपालिका, उद्यान विभाग यांना दिनांक ०५/११/२०१५ रोजी अवैध वृक्षतोडीची माहिती मिळाली. त्यानुसार फिर्यादीतर्फे श्री. अनिल भाऊ साबळे यांनी पुणे महानगरपालिका (येथुन पुढे संक्षिप्ततेकरिता 'पुणे मनपा' असे संबोधण्यात येईल) पुणे महानगरपालिका हद्दीतील सर्वे नंबर १/८ व २/८ एरंडवना, सिल्वर वुड बिल्डींग, कर्वे रोड, पाळंदे कुरिअरच्या मागे, पुणे–४ येथे जाऊन पाहणी केली. त्या ठिकाणी खालीलप्रमाणे झाडे विनापरवाना तोड केल्याचे निदर्शनास आले –

| **अ. क्र.** | **वृक्षांची नावे** | **मध्य वेढी (मीटर)** | **उंची (मीटर)** | **अंदाजे वर्षे** | **झाड/झाडांच्या फांद्या तोडल्याबाबतचे वर्णन** |
|---|---|---|---|---|---|
| १ | शेवगा–२ | १.१० ते १.२० | १० ते ११ | १२ ते १५ | सदरहू वृक्ष सद्य स्थितीत जागेवर आढळुन येत नाही. |
| २ | आवळा–१ | ०.४० | ८ | ७ | |
| ३ | रामफळ–१ | ०.४० | ८ | ७ | |
| ४ | अशोक–१ | ०.४० | ८ | ७ | |

**०३.** फिर्यादमध्ये पुढे असे आले आहे की, फिर्यादी श्री. अनिल भाऊ साबळे यांनी घटनास्थळाची पाहणी केली, दिसत्या परिस्थितीचा घटनास्थळ पंचनामा (निशाणी ५१) केला, वृक्षतोडीच्या स्थळाचे छायाचित्र काढले आणि त्यानुसार कार्यालयास अहवाल सादर केला. त्यानंतर फिर्यादी पुणे मनपाने आरोपीस वर नमुद वृक्षतोड केल्यामुळे दोन नोटीस पाठविल्या. सदर नोटीसला आरोपीने खुलासा देखील सादर केला नसल्यामुळे पुणे मनपाने आरोपीविरुध्द प्रस्तुतचा खटला दाखल केला.

**०४.** आरोपीस खटल्यात समन्स काढण्यात आल्यानंतर आरोपी खटल्यात हजर झाले. गुन्ह्याचे दोषारोप आरोपींना मराठीत समजावुन सांगितले, आरोपीस ते समजले. आरोपीने गुन्हा कबुल केला नाही. निशाणी क्र.१९ अन्वये आरोपीचे निवेदन नोंदविण्यात आले व त्याचे विनंतीवरुन सदरचा खटला आरोपीविरुध्द पुढे चालविण्यात आला.

**०५.** गुन्हा सिध्द करण्यासाठी फिर्यादीने स्वतःची साक्ष नोंदविली व कागदोपत्री पुरावा दाखल केला. निशाणी क्र.५७ अन्वये आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३(१)(ब) अन्वये तपासणी घेण्यात आली. आरोपीने त्याचेविरुध्द सर्व बाबी नाकारल्या व ते निर्दोष असल्याचे सांगितले.

**०६.** उभय पक्षांचा युक्तीवाद, खटल्यातील पुरावा व इतर कागदपत्रांचा विचार करता खालील मुद्दे निर्माण होतात त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसहीत नोंदवित आहे ते येणेप्रमाणेः

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | फिर्यादी पक्ष सिध्द करतो काय की, दिनांक ०५/११/२०१५ रोजी अगर त्या दरम्यान पुणे महानगरपालिका हद्दीतील सर्वे नंबर १/८ व २/८ एरंडवना, सिल्वर वुड बिल्डींग, कर्वे रोड, पाळंदे कुरिअरच्या मागे, पुणे-४ येथे जाऊन पाहणी केली. त्या ठिकाणी आरोपीने वर नमूद वृक्षांची विनापरवाना, अनाधिकृतरित्या तोड केली होती किंवा ते सदर वृक्षतोडीस कारणीभुत झाले होते? | नाही. |
| २. | आदेश काय ? | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात आले. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ करिता –**

**०७.** आरोपीविरूध्द गुन्हा शाबीत करण्याकरिता फिर्यादी पक्षाने ही बाब शाबीत करणे आवश्यक आहे की, आरोपीनी अवैधरित्या वर नमूद वृक्षाची विनापरवाना अनाधिकृतरित्या तोड केली होती व ते **महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम ८(१) सह कलम २१(१)** चा अन्वयेच्या तरतुदीप्रमाणे शिक्षेस पात्र आहे. आरोपीतर्फे पुरावा देण्यात आलेला नाही.

**०८.** गुन्हा सिध्द करण्यासाठी फिर्यादी पक्षातर्फे श्री. अनिल भाऊ साबळे यांनी त्यांचा पुरावा दिलेला आहे. याशिवाय, घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.५१), घटनास्थळाचे छायाचीत्र, नोटीस(नि.क्र.५२ व ५३), अहवाल(नि.क्र.५४), अधिकार पत्र (नि.क्र.५५) इ. कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

**०९.** फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ फिर्यादी श्री. अनिल भाऊ साबळे यांनी तोंडी पुराव्यात असे कथन केले आहे की, अनिल कोष्टी यांनी कार्यालयाकडे लेखी तक्रार सादर केलेली होती. त्यानंतर दिनांक ०५.११.२०१५ रोजी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता, त्या ठिकाणी वृक्षतोडीबाबत कोणताही पुरावा दिसुन न आल्याने त्यांनी कार्यालयात उपलब्ध असलेल्या अंतिम ना हरकत प्रमाणपत्राची तपासणी केली. त्यानुसार घटनास्थळ पंचनामा निशाणी ५१ तयार केला. ना हरकत प्रमाणपत्रामध्ये एकुण ९ झाडांचा उल्लेख होता व प्रत्यक्ष ४ झाडेच अस्तित्वात होती. त्यानुसार तोडलेल्या वृक्षांचे वर्णन पंचनाम्यामध्ये लिहिलेले आहे. त्यानुसार कार्यालयामार्फत आरोपी यांना दिनांक ०४.१२.२०१५ व ३१.१२.२०१५ रोजी नोटीस निशाणी ५२ व ५३ पाठविण्यात आल्या होत्या. त्यानंतर सविस्तर अहवाल निशाणी ५४ तयार करून

कार्यालयास सादर केला. सदर नोटीसला आरोपी यांनी खुलासा देखील सादर केला नसल्यामुळे आरोपी यांच्या विरूद्ध प्रस्तुतची फिर्याद दाखल करण्यात आली.

१०. फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.१ यांनी त्यांच्या उलटतपासात असे मान्य केले आहे की, सदरची एनओसी प्रस्तुत फिर्याद सोबत दाखल केलेली नाही. सदरची एनओसी ही बांधकाम पुर्ण झाल्यानंतर उद्यान विभागाने बिल्डर यांना दिलेली एनओसी होती. सदर साक्षीदार पुढे मान्य करतात की, तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने आरोपी यांना नोटीस पाठविली होती. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की, घटना ठिकाणावरील इमारतीमध्ये आरोपी राहात नाहीत तर त्या ठिकाणी मुळ तक्रारदार राहात होते. फिर्याद दाखल करत असताना त्या सोबत असलेल्या प्रतिज्ञा लेखामध्ये झाडांचा विस्तार कमी केलेला आहे असे नमूद केलेले आहे. इमारत बांधुन पुर्ण झाल्यानंतर त्याचे डीड ऑफ डिक्लेरेशन केल्यानंतर त्याचे सदर इमारतीची व सदनिकांची पुर्ण मालकी ही संस्थेकडे दिलेली असते व त्यामध्ये बिल्डर यांची कोणतीही मालकी व हक्क राहात नाही.

११. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुत प्रकरणात आरोपीविरुद्ध दोषारोप सिद्धतेकामी फिर्यादी पक्षातर्फे फिर्यादी यांची साक्ष अभिपटलावर नोंदवण्यात आली आहे. फिर्यादी यांच्या तोंडी आणि लेखी पुराव्याचे अवलोकन केले. फिर्यादीने अनाधिकृत वृक्षतोडीची माहिती मिळाल्यानंतर घटनास्थळावर जावुन पाहणी केली आणि त्याबाबतचा सविस्तर पंचनाम्यासहित अहवाल (नि.क्र.५४) कार्यालयात सादर केला.

१२. फिर्यादी पक्षातर्फे संबंधीत विभागाचे हॉर्ट्री मिस्त्री श्री. अनिल भाऊ साबळे

यांची साक्ष नोंदवण्यात आली. आरोपीस वृक्षतोड करताना फिर्यादी यांनी स्वतः पाहिलेले नाही तसेच मुळ तक्रारदार यांना देखील प्रस्तूत प्रकरणात तपासण्यात आलेले नाही. प्रस्तुत प्रकरणात घटनास्थळावरील एकाही प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराचा जबाब नोंदविला गेलेला नाही अथवा घटनास्थळाच्या आजुबाजूला राहणाऱ्या व्यक्तींचा जबाब देखील नोंदविला गेलेला नाही. तसेच प्रत्यक्ष घटनास्थळावरुन कोणताही लाकुडफाटा जप्त केलेला नाही. फिर्यादी यांनी तक्रारदार यांचे सांगण्यावरून आरोपी यांच्या विरूद्ध फिर्याद दाखल केलेली आहे. त्यामुळे प्रत्यक्ष वृक्षांची तोड ही नेमकी कधी आणि कोणी केली हे स्पष्ट होत नाही. तसेच आरोपीविरुध्द गुन्हा शाबित करणारा कोणताही पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. त्यामुळे आरोपीने फिर्यादमध्ये नमूद वृक्षांची तोड केली ही बाब फिर्यादीपक्षाने सिध्द केलेली नाही. करिता मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवण्यात येते.

**<u>मुद्दा क्रमांक २ करिता</u> –**

**१३.** फिर्यादीने कथित वेळी व स्थळी वृक्षतोड झाल्याची घटना सिध्द केली नाही. त्यामुळे सबब, आरोपी निर्दोष मुक्त होणेस पात्र ठरतात, करिता न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो–

**:: <u>आदेश</u> ::**

१. आरोपी **श्री. किरण रमेशलाल बोरा** यांना फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५(१) अन्वये त्यांच्यावर ठेवण्यात आलेल्या **महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे जतन अधिनियम, १९७५ चे कलम ८(१) सह कलम २१(१)** अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्याच्या आरोपातुन निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपींचा जामिन बंधपत्र किंवा जात मुचलका रद्द करण्यात येतो.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–अ अन्वये, पुढील सहा महिन्याचे कालावधीकरिता रक्कम रुपये १५,०००/– चा वैयक्तिक बंधपत्र दाखल करावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.)

SAYYAD NAJMEEN SALIMSHA

Digitally signed by SAYYAD NAJMEEN SALIMSHA
Date: 2026.07.22 17:57:12 +0530

स्थळः पुणे

दिनांकः २२/०७/२०२६.

**(श्रीमती एन. एस. सय्यद)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
(मनपा न्यायालय, पुणे), जि. पुणे.

**प्रमाणपत्र**

मी शपथेवर सांगतो की या पी.डी.एफ न्यायनिर्णय फाईलमधील मजकुर हा मुळ न्यायनिर्णयातील मजकुराशी शब्द–न–शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| कोर्टाचे नांव | : | **श्रीमती एन. एस. सय्यद,**<br>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, (मनपा न्यायालय),<br>जि. पुणे |
| लघुलेखकाचे नांव | : | श्री. सुनिल गुलाब सुर्यवंशी |
| निकाल दि. | : | २२.०७.२०२६ |
| सही केलेची दि. | : | २२.०७.२०२६ |
| अपलोड केलेची दि. | : | २२.०७.२०२६ |